**Publication: Navshakti** **Date: Wednesday, 4th February, 2015**

**Edition: Mumbai**

# इंडियाफर्स्ट लाईफ इन्शुरन्सच्या हॅप्पी इंडिया प्रोजेक्टमध्ये मुंबईतील ६ टीम्सचा समावेश

मुंबई – इंडियाफर्स्ट लाईफ इन्शुरन्सने राबवलेल्या हॅप्पी इंडिया प्रोजेक्टमध्ये देशभरातून संहभागी झालेल्या १५,०००हून अधिक विद्यार्थ्यांमधून अतिशय कडक चाळणी प्रक्रियेनंतर सर्वोत्तम २५ टीम्स निवडल्या गेल्या आहेत. रेयान इंटरनॅशनल स्कूलच्या फँटास्टिक ४, जिनीयस माईंड्स ऑफ इनोव्हेशन, टीम चॅलेंजर्स; पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या वुई चेंज आणि टीम नेक्स्ट आणि डी. जी. खेतान इंटरनॅशनल स्कूल अँड बी. के. गाडीया 'ए' लेव्हल ज्युनियर कॉलेजची द स्पंक यांनी सर्वोत्तम २५ टीम्समध्ये स्थान पटकावले आहे. या टीम्सनी आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण, शिक्षण आणि बेरोजगारी या विषयांवर आपल्या कल्पना मांडल्या होत्या. हॅप्पी इंडियामध्ये ११ ते १६ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांकडून शिक्षण, आरोग्य, ऊर्जा संधारण, सुरक्षा, पर्यावरण सुरक्षा आणि आर्थिक सर्वसमावेशकता अशा महत्त्वपूर्ण विषयांवर आपल्या कल्पना मांडल्या गेल्या होत्या, असे इंडियाफर्स्ट लाईफ इन्शुरन्सचे मुख्य विपणन अधिकारी मोहित रोचलानी म्हणाले.

A Joint Venture of
Bank of Baroda Legal & General Andhra Bank